क्र. जिपना/साप्रवि/स्था.४/सिआर- ४३/२०२३-२४/ 1822
कार्यालय : साप्रवि,जिल्हा परिषद, नागपुर
सामान्य प्रशासन विभाग
दिनांक : 01/06 /२०२३

प्रति,

१. -----------------------------
२.-----------------------------
३.-----------------------------

**विषय :- राष्ट्रीय ग्राम स्वराज अभियान अंतर्गत सन २०२२-२३ जिल्हा परिषद,नागपूर व त्या अंतर्गत असणाऱ्या सर्व १३ पंचायत समित्यांमध्ये इंटरनेट बेस्ड व्हर्च्यूअल इंटरएक्टीव्ह क्लासरूम प्रस्थापित करुन कार्यान्वित करण्याबाबत.**

उपरोक्त विषयाचे अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, जिल्हा परिषद,नागपूर व त्या अंतर्गत असणाऱ्या सर्व १३ पंचायत समित्यांमध्ये इंटरनेट बेस्ड व्हर्च्यूअल इंटरएक्टीव्ह क्लासरूम प्रस्थापित करुन कार्यान्वित करण्याकरीता आवश्यक साहित्याचे खालिलप्रमाणे विवरण सादर करण्यात येत आहे.

**तांत्रिक तपशील**

1. A. 65 inch commercial TV/Professional Large Format Display
2. Camera
3. Hand Mike (P.A.Wireless Microphone)
4. Speaker
5. Audio Cable For PC To Speaker
6. Tripod
7. Desktop Computer with Mouse & Keyboard, Window 10pro 64,intel core i5-10400 (2.9 GHz base Frequancy,12 MB L3 cache)
8. Any other additional item to be taken for enabling effective virtual Classroom

**अटी व शर्ती** -

१. पुरवठा धारकास पुरवठा आदेश दिल्यापासून तात्काळ सेवा देणे बंधनकारक राहील.
२. पुरवठा धारकांनी दरपत्रकासोबत (तांत्रिक लिफाफा) खालीलप्रमाणे कागदपत्रे सादर करावी.
अ) व्यवसाय प्रमाणपत्राची प्रत.
ब) मागील तीन वर्षाचे आयटी रिटर्न.
क) जीएस टी प्रमाणपत्र,पॅन कार्ड,टॅन कार्ड इत्यादी .
३. शासकीय कार्यालयाच्या ठिकाणी पुरवठा केल्याबाबतचे पुर्व अनुभवाचे प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.
४. दरपत्रकात नमुद साहित्याचा पुरवठा करणे बंधनकारक राहील.
५. **इंटरनेट बेस्ड व्हर्च्यूअल इंटरएक्टीव्ह क्लासरूम** प्रस्थापीत करून कार्यान्वीत करण्याची संपूर्ण जबाबदारी पुरवठा धारकाची असेल.याबाबत कोणत्याही प्रकारचे वाहतुकीचे (Transportation chrges) शुल्क अदा करण्यात येणार नाही.
६. **इंटरनेट बेस्ड व्हर्च्यूअल इंटरएक्टीव्ह क्लासरूम** प्रस्थापीत करण्याकरीता लागणारे ईल्केट्रीकल साहित्य व इतरअनुषंगीक साहित्य उपलब्ध करुन प्रस्थापीत करण्याची संपूर्ण जबाबदारी पुरवठाधारकाची राहील. त्याबाबत कोणतेही देयक अदा केले जाणार नाही..
७. **इंटरनेट बेस्ड व्हर्च्यूअल इंटरएक्टीव्ह क्लासरूम** चा दोष निवारण कालावधी हा १ वर्षांचा राहील. १ वर्ष देखभाल दुरुस्ती करणे पुरवठादारास बंधनकारक राहील सदर कालावधीत दोष निवरणाकरीता कोणतेही देयक अदा केले जाणार नाही..
८. प्राप्त देयकातील १० टक्के रक्कम ही ३ महीण्याकरीता राखुन ठेवण्यात येईल व **इंटरनेट बेस्ड व्हर्च्यूअल इंटरएक्टीव्ह क्लासरूम** सुरळीत सुरु असल्याचे प्रमाणपत्र कार्यालयास प्राप्त झाल्याखेरीज अदा केल्या जाणार नाही.
९. **जिल्हा परिषद,नागपूर व त्या अंतर्गत असणाऱ्या सर्व १३ पंचायत समित्यांमध्ये इंटरनेट बेस्ड व्हर्च्यूअल इंटरएक्टीव्ह क्लासरूम** उभारणी विहीत कालावधीत पुर्ण करुन हस्तांतरण प्रमाणपत्र, तसेच सरुळीत सुरु करुन यंत्राविषयक पुर्ण माहीती स्थानिक कार्यालयाला देण्यात आल्याचे व याबाबतचे प्रत्येक पंचायत समिती मार्फत प्रमाणपत्र तसेच warranty, Guarantee Card हस्तांतरण प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील.

१०. **इंटरनेट बेस्ड व्हर्च्यूअल इंटरएक्टीव्ह क्लासरूम** Technical Specification नुसार परिपूर्ण उभारणी, पूर्ण क्षमतेने कार्यरत आहे. किंवा कसे? याबाबत तपासणी अहवाल **MAHA-IT** यांचे कडुन प्राप्त करावा लागेल.

११. **इंटरनेट बेस्ड व्हर्च्यूअल इंटरएक्टीव्ह क्लासरूम** करीता आवश्यक साहित्य निर्देशीत जागेवर पोहोचविणे तसेच प्रस्थापीत करण्याबाबत अतिरीक्त रक्कम अदा केल्या जाणार नाही.

१२. **इंटरनेट बेस्ड व्हर्च्यूअल इंटरएक्टीव्ह क्लासरूम** ची उभारणी सुरु करण्याआधी तसेच उभारणी केल्यानंतर फोटो देयकासोबत सादर करणे बंधनकारक राहील.

**१३**. निवीदेत काही बदल करावयाचे झाल्यास व निवीदा रद्द करावयाची झाल्यास सर्व अधिकार मा.मुख्य कार्यकारी अधिकारी , जिल्हा परिषद,नागपूर यांना राहतील.

**१४**. सेवा समाधानकारक न वाटल्यास पुरवठा आदेश कोणत्याही प्रकारची सुचना न देता रद्द करण्याचा अधिकार मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नागपूर यांचेकडे राखीव राहील.

**१५**.संबंधित पुरवठादाराने पुरविलेले साहित्य उत्तम दर्जाचे व व्यवस्थित असल्याची खात्री झाल्यानंतरच देयकाचे शोधन करण्यात येईल.

**उपरोक्त १ ते १५ अटी व शर्तीनुसार रूपये 500/- च्या स्टॅम्प पेपरवर करारनामा करणे बंधनकारक राहील.**

**(विपुल जाधव )**
**उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा.)**
**जिल्हा परिषद, नागपुर**

**प्रतिलीपी -**

१. मा. अध्यक्ष/उपाध्यक्ष/सभापती विषय समिती (सर्व)......................, जि. प. नागपूर यांना माहितीस्तव सविनय सादर.
२. मा. मुख्य कार्यकारी अधिकारी/अति.मु.का.अ. जिल्हा परिषद, नागपुर यांना माहितीस सविनय सादर.
३. मा. मुख्य लेखा तथा वित्त अधिकारी जिल्हा परिषद, नागपुर यांना माहितीस व योग्य कार्यवाहीस सविनय सादर.
४. निवड नस्ती.

**उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा.)**
**जिल्हा परिषद, नागपुर**